पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## विद्यार्थी समाधान सर्वेक्षण अहवाल

### शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील बी. ए., बी. कॉम व बी. एस्सी. शाखेच्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून विद्यार्थी समाधान सर्वेक्षण घेण्यात आले. सदरील सर्वेक्षणात पुढील निष्कर्ष मिळालेत.

- सदरील सर्वेक्षण करतांना बी. ए., बी. कॉम व बी. एस्सी. च्या एकूण (६०६) विद्यार्थी संख्येच्या १० टक्के विद्यार्थ्यांकडून (६०) प्रश्नावली भरुन घेण्यात आली. ज्यात बी. ए. चे २३ विद्यार्थी, बी. कॉम चे १७ व बी. एस्सी चे २० विद्यार्थी सहभागी होते. विद्यार्थ्यांमधील लिंगनिहाय प्रमाण ३१ मुली व २९ मुले असे होते.
- एकूण ६० विद्यार्थ्यांपैकी सर्वाधीक ५३ टक्के विद्यार्थ्यांनी वर्गात ८५ ते १०० टक्के अभ्यासक्रम पुर्ण होतो असे सांगितले आहे. उर्वरित ४६ टक्के विद्यार्थ्यांनी वर्गात ७० ते ८४ टक्के अभ्यासक्रम पुर्ण होतो असे सांगितले आहे.
- शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यास कितपत सक्षम आहेत असे विचारले असता, सर्वाधिक ४३.३३ टक्के विद्यार्थ्यांनी शिक्षक नेहमीच प्रभावी संवाद सांधतात असे सांगितले. त्या खालोखाल ३१.६७ टक्के विद्यार्थ्यांनी फक्त समाधानकारक संवाद साधतात असे सांगितले. उर्वरित २५ टक्के विद्यार्थ्यांनी कधी कधी संवाद साधतात असे सांगितले आहे.
- प्रस्तुत सर्वेक्षणातील सर्वच १०० टक्के विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रशिक्षण, विद्यार्थी विनिमय, क्षेत्रभेट यासारख्या संधी नेहमी उपलब्ध करुन दिल्या जातात असे नमुद केले आहे.
- महाविद्यालयातील शिक्षक शिक्षणाच्या बाबतीत सामाजिक व भावनात्मक विकास कसा साधतात असे विचारले असता सर्वाधिक ५० टक्के खूप छान तर ३० टक्के माफक प्रमाणात विद्यार्थ्यांचा सामाजिक व भावनात्मक विकास साधतात असे सांगितले आहे. तर केवळ २० टक्के विद्यार्थ्यांनी शिक्षक लक्षणिय असा विद्यार्थ्यांचा सामाजिक व भावनात्मक विकास साधतात असे सांगितले आहे.
- महाविद्यालयातील शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांची आवड, त्यानुसार पाठ्यक्रम आणि त्याचे फलित याबाबत कसे सुचित करतात असे विचारले असता सर्वाधिक ४१.६७ टक्के विद्यार्थ्यांनी प्रत्येक वेळी त्या खालोखाल ३३.३३ टक्के विद्यार्थ्यांनी कधी कधी आणि उर्वरित २५ टक्के विद्यार्थ्यांनी सहसा सूचित करतात असे नमुद केले आहे.
- प्रस्तुत सर्वेक्षणातील सर्वाधिक ७३.३३ टक्के विद्यार्थ्यांनी शिक्षक आमच्यातील बदस्थाने ओळखून आम्हांला वाजवी आणि उर्वरित २६.६७ टक्के विद्यार्थ्यांनी पुर्णपणे प्रेरित करतात

असे सांगितले आहे. आम्हांला आमचे शिक्षक सतत प्रोत्साहन देतात असे त्यांनी नमुद केले आहे.

- संस्था शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सातत्यपूर्ण गुणवत्ता विकास नियंत्रण व आढावा घेते का याबाबत विद्यार्थ्यांना विचारले असता सर्वाधिक ७८.३३ टक्के विद्यार्थ्यांनी सहमती दर्शविली आहे. तर २१.६७ टक्के विद्यार्थ्यांनी पुर्णत: सहमती दर्शविली आहे.
- प्रस्तुत सर्वेक्षणातील सर्वाधिक ६५ टक्के विद्यार्थ्यांनी शिक्षक आम्हांला अभ्यासेत्तर उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देतात याविषयी सहमती दर्शविली आहे. उर्वरित ३५ टक्के विद्यार्थ्यांनी देखील पुर्णत: सहमती दर्शविली आहे.
- विद्यार्थ्यांना शिक्षक आपणास जागतीक स्पर्धेत टिकण्यास उपयुक्त असलेले जीवन कौशल्य, रोजगार कौशल्य आत्मसात करण्यास प्रयत्न करतात का असे विचारले असता सर्वाधिक ४० टक्के विद्यार्थ्यांनी मध्यम प्रमाणात त्या खालोखाल ३६.६७ टक्के विद्यार्थीनी काही प्रमाणात आणि उर्वरित २३.३३ टक्के विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करतात असे सांगितले आहे.
- प्रस्तुत सर्वेक्षणातील सर्वाधिक ४५ टक्के विद्यार्थ्यांनी ७० ते ८९ टक्के शिक्षक शिकवितांना एलसिडी प्रोजेक्टरचा वापर करतात असे सांगितले आहे. त्या खालोखाल ३५ टक्के विद्यार्थ्यांनी ५० ते ६९ टक्के शिक्षक शिकवितांना एल सि डी प्रोजेक्टरचा वापर करतात असे सांगितले आहे. उर्वरित २० टक्के विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा अधिक शिक्षक शिकवितांना एलसिडी प्रोजेक्टरचा वापर करतात असे सांगितले आहे.
- महाविद्यालयातील अध्ययन-अध्यापन पध्दती विषयी विद्यार्थ्यांची मते जाणून घेतली असता सर्वाधिक ६६.६७ टक्के विद्यार्थ्यांनी सहमती दर्शविली आहे. तर २८.३३ टक्के विद्यार्थ्यांनी पुर्णत: सहमती दर्शविली आहे. केवळ ५ टक्के विद्यार्थ्यांनी तटस्थ भूमिका घेतली आहे.
- महाविद्यालयातील अध्ययन-अध्यापन पध्दतीचा दर्जा सुधारण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रमुख सूचना पुढीलप्रमाणे आहेत.
  १. विज्ञान शाखेसाठी पुर्णवेळ प्राध्यापकांची भरती करावी.
  २. ग्रंथालयात विज्ञान शाखेची पुस्तके वाढवावीत.
  ३. अध्यापकांनी अभ्यासात कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष द्यावे.
- विद्यार्थी समाधान सर्वेक्षणातील वरील मुद्यांची चर्चा केल्यानंतर असे निदर्शनास आले की, महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थी अध्ययन-अध्यापन व अभ्यासेत्तर उपक्रमाविषयी समाधानी आहेत.